# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

५)
जा.क्र.आस्था/वंजारवाडी/विका/क८८/चौकशी/आदेश/२०१८
सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, नांदगांव
यांचे कार्यालय तालुका- नांदगांव जि नाशिक
दिनांक :- २१/४/२०१८

वाचावे :-१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतुद
२. श्री. एम.डी. पाटील, लेखापरिक्षक सहकारी संस्था नांदगांव यांचेकडील लेखापरिक्षण अहवाल जा.क्र.लेप/अह./२०१६-२०१७/सन २०१७ दि. २/४/२०१८ रोजीचा प्रशासकीय विनिर्दिष्ठ अहवाल
३.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचेकडील दरमहा होणाऱ्या उप निबंधक/सहाय्यक निबंधक आढावा सभेतील सुचना

ASSISTANT REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NANDGAON, DIST. NASHIK

ज्याअर्थी वंजारवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वंजारवाडी, ता. नांदगांव जिल्हा नाशिक या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये या कार्यालयाकडे नोंदणी झालेली आहे.

ज्याअर्थी उपरोक्त संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेने स्विकारलेल्या व या कार्यालयाने मंजुर केलेल्या उपविधीतीरल तरतुदी अन्वये करणे संस्थेस व संस्थेच्या संचालकाना बंधनकारक आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक २ अन्वये श्री. एम. डी. पाटील , तालुका लेखापरीक्षक, सहकारी संस्था नांदगांव यांनी वंजारवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वंजारवाडी, ता.नांदगांव जि. नाशिक या संस्थेचा सन २०१६-२०१७ या कालावधीचा लेखापरीक्षण अहवाल या कार्यालयास सादर करुन लेखापरिक्षणच्या वेळी निदर्शनास आलेल्या अफहाराबाबतचा प्रशासकीय विनिर्दिष्ठ अहवाल पुढील कायदेशीर कार्यवाहीस्तव सादर केला आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक ३ अन्वये मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था नाशिक यांचेकडील उप निबधक/ सहाय्यक निबंधक, दिनांक ७/४/२०१८ आढावा सभेतील सुचना देवून प्रशासकीय विनिर्दिष्ठ अहवालावर पुढील कार्यवाही करणे बाबत सुचित केले आहे.

ज्याअर्थी वाचावे क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८८ अन्वये एखादया संस्थेची लेखापरिक्षण निरिक्षणच्या प्रारंभाच्या तारखेपुर्वी संस्थेच्या कोणत्याही पैशाचे किंवा मालमत्तेचे अपयोजन केले आहे. किंवा त्यांने असा पैशा किंवा मालमत्ता ठेवून घेतली आहे. किंवा त्याच्या संबंधात तो उत्तरदायी किंवा जबाबदार झाला आहे. किंवा संस्थेच्या बाबतीत कोणतेही अपकार्य किंवा विश्वासघात केल्या बदल तो दोषी झाला आहे. याबाबत निबंधकाचे खात्री होईल तर निबंधकास किंवा त्याबाबत त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अशा व्यक्ती विरुध्द अरोप ठेवला येईल अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, वाचावे क्रमांक २ अन्वये या कार्यालयास सादर झालेल्या अनुक्रमे प्रशासकीय विनिर्दीष्ठ अहवाल पहाता अपहार व गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आल्याने सदरच्या प्रशासकीय विनिर्दीष्ट अहवालातील गंभीर मुद्दांबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकाऱ्या मार्फत चौकशी करुन त्यांच्यावर उपरोक्त अफहारातील / गैरव्यवहारातील जबाबदारी निश्चित करुन ती त्यांचेकडून वसुल करणे क्रमप्राप्त असल्याची माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

( कृ.मा.प.)

Scanned by CamScanner

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी एस.पी. कांदळकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक असा आदेश देतो की, वंजारवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वंजारवाडी ता. नांदगांव जि. नाशिक या संस्थेचे श्री. एम.डी. पाटील, लेखापरिक्षक; सहकारी संस्था, नांदगांव ता. नांदगांव जि. नाशिक यांनी सन २०१६-२०१७ या कालावधीच्या केलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने सादर केलेल्या प्रशासकीय विनिर्दीष्ट अहवालातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील मुद्यांची चौकशी करणेकामी ॲड. श्री. एम.पी. कासार पाटील, यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये सखोल चौकशी करुन व संबंधीतावर योग्य ती जबाबदारीची रक्कम निश्चित करुन चौकशी अहवाल आवश्यकत्या कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करावा. सदर चौकशी कामी चौकशी अधिकारी यांना चौकशी फी म्हणून रक्कम रुपये १०,०००/- मंजूर करण्यात येत असून त्याची जबाबदारी संबंधीतावर निश्चित करावी. चौकशी अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखे पासून सहा महिन्यात सदरची चौकशी पुर्ण करावी. व चौकशी अहवाल स्वंयस्पष्ट अभिप्रायासह / निश्चित केलेल्या जबाबदारीसह दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

सदरचा आदेश आज दिनांक २१/०४/२०१८ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारित केला असे.

ASSISTANT REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NANDGAON, DIST. NASHIK
सत्यमेव जयते

स्थळ :- नांदगांव
दिनांक :- २१/०४/२०१८

( एस. पी. कांदळकर )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नांदगांव जि.नाशिक

प्रति,

१) ॲड. श्री. एम. पी. कासार पाटील ॲडव्होकेट, नाशिक
मयुरेश, चेतना नगर, राणे नगरच्या पाठीमागे आव्हाड मळा नाशिक -९

२/- त्यांना कळविण्यांत येते की, आदेशासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मधील मुद्याची मुदेनिहाय चौकशी करुन व जाबबदारी निश्चित करुन आवश्यक त्या कागदपत्रासह/ पुराव्यासह अहवाल या कार्यालयास मुदतीत सादर करावा.

२) चेअरमन/सचिव,
वंजारवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. वंजारवाडी, ता. नांदगांव जि. नाशिक

२/- आपणास आदेशीत करण्यांत येते की, चौकशीकामी चौकशी अधिकारी यांना योग्य ते सहकार्य करावे व यात कसुर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

<u>प्रत माहितीस्त सविनय सादर.</u>

१. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग नाशिक.
२. मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.
३. मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, नाशिक.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, नांदगांव जि.नाशिक

Scanned by CamScanner